# वेडींग

अरुण निसरगंड

“You are not worthy of my daughter” तिचे वडील ओरडले. “काय समजलास काय तू स्वतःला? शहाण्णव कुळीचे आम्ही. भिक्षुकी नाही केली तुमच्यासारखी”

आमच्या घराण्यात कुणीही भिक्षुकी केली नाही हेच काय पण गेल्या तीनचार पिढ्यात गायत्री मंत्रही म्हटला नसेल हे मी त्यांना सांगणार होतो. पण सुगंधाला वर ऐकू जायला नको म्हणून मी गप्प बसलो.

चूक माझी होती. मी कंपनीच्या मालकाच्या मुलीशी संधान बांधायला नको होते.

पण हे काही मी प्लान करून केले नव्हते. इंजीनियर झाल्यावर करडे-पाटलांच्या कंपनीत मला नोकरी मिळाली होती. पहिल्या काही दिवसातच माझे साहेबांवर चांगले इम्प्रेशन पडले होते. मालकांचे काही महत्वाचे प्रॉजेक्ट असले तर ते माझ्यावर सोपवायचे. त्यामुळे पाटीलसाहेबांची, मालकांची, ओळख झाली होती. एक दोनदा जिमखान्यावरच्या त्यांच्या बंगल्यात जायचाही योग आला होता. तेव्हाच सुगंधाची आणि माझी नजरानजर झाली होती. नंतर फर्ग्युसन कॉलेजात एकदोनदा भेट झाली होती. तिने हसून ओळख दिल्यावर आम्ही काहीतरी कारण काढून भेटायला लागलो होतो.

तिच्या मोठ्या बहिणीच्या लग्नात आणखीच घसट वाढली. नगरहून आलेल्या लग्नातल्या पाहुण्यांना मदत व्हावी यासाठी मालकांनी मला हजर राहायला सांगितले होते. नाही म्हणणे शक्यच नव्हते. शिवाय सुगंधा तेथे असणार हे माहिती होते. त्या लग्नानंतर ती माझ्याकडे जास्त लक्ष द्यायला लागली हे मला आठवते. ते का याचे कारण मी गेली दीड दोन वर्षे शोधायचा प्रयत्न करतोय. तेव्हाच तिला विचारायला हवे होते. दिसायला मी वाईट नसलो तरी फार हँडसम होतो असे नाही. इंजीनीरिंग कॉलेजात फर्स्ट रँक होतो. आणि तिचे वडील माझ्या कामावर खुष होते हे तिने बघितले होते एवढेच. त्या दिवशी मला घराबाहेर हाकलून दिले तोपर्यंत तरी ते खुष होते.

तिच्या बहिणीचे थाटात झालेले लग्न, लग्नात आलेली मजा, आणि नेक्स्ट-इन-लाइन म्हणून तिला मिळालेली अटेन्शन आणि चेष्टा या गोष्टींनी तिलाही रोमँटिक वाटले असा माझा अंदाज होता. दिसायला तिची मोठी बहीणच सरस होती. पण नव्या साडया, ज्युलरी, हेअर-स्टाइल, नटल्यामुळे सुगंधावरून माझीच काय पण इतर बऱ्याच जणांची नजर हटत नव्हती. लग्नाच्या तयारीत मी सारखा जवळपास असल्याने माझा नंबर लागला असावा. Right time right place. We both were ready for romance.

“Get out” मालक ओरडले. “उद्या फॅक्टरीत पाऊल ठेवू देऊ नकोस. वॉचमन लाथा मारून बाहेर काढतील. देशपांड्यांना मी सांगून ठेवणार आहे”.

“देशपांडे साहेबांना आजच मी नोकरी सोडणार असल्याचे सांगितले आहे. मला यू एस मधे स्टॅन्फर्डमधे  मास्टर्सला ॲडमिशन मिळाली आहे हे तुम्हाला कळवायला आणि सुगंधाचे आणि माझे मन उघडं करायला मी आलो होतो” हे सांगायचा चान्स पाटलांनी मला दिला नव्हता.

आणखी तमाशा नको म्हणून मी बंगल्यातून बाहेर पडलो होतो. सुगंधा वरच्या खिडकीतून खाली बघत होती. तिची आणि माझी ती शेवटची भेट.

**लॅरी** माझा बॉस. स्टॅन्फर्डचे एक वर्ष संपल्यावर समर जॉब शोधताना लॅरी मला भेटला होता. त्याने नुकतीच मास्टर्स संपवली होती. त्याला नोकरी मिळाल्यावर लगेच फोन करून मला रेझ्यूमे पाठवायाला सांगितले होते. आणि साहेबाशी बोलून मला इंटर्नशिप मिळवून दिली होती. सनीसाइडला फार्म ईक्विपमेंटची फॅक्टरी होती. मला त्या विषयाचा अनुभव हवा होता. पुण्याला परतल्यावर करडे-पाटलांच्या नाकावर टिच्चून तशीच फॅक्टरी काढायची होती. नोकर चाकरांसमोर माझ्या पूर्वजांची भिक्षुकी काढल्याचे मी विसरलो नव्हतो.

I had decided to bring his daughter coffee every morning and kisses every night for the rest of my life, हे पाटलांना अजून माहीत नव्हते.

पण तो दिवस उजाडेपर्यंत तडफड होत होती त्याच्यावर उपाय नव्हता.

लॅरी माझ्याहून बराच मोठा होता. त्याचे एक लग्न होऊन डिव्होर्स् झाला होता. त्याचे मला आश्चर्य वाटले नाही. तो जरा तऱ्हेवाईक होता हे लगेच ओळखले होते. Difficult to live with.

दर वीकएंडला नवीन रेस्टॉरंट शोधून काढायचो. बार आणि टॅव्हर्नस् मधे जाऊन पूल खेळायचो आणि yes, प्यायचो. बार आणि टॅव्हर्नस् च्या गोष्टी मी सुगंधाला कळवत नव्हतो. पण बाकी सर्व डीटेलमधे लिहायचो.

अमेरिकेत हे माझे पहिलेच वर्ष असल्यामुळे लॅरी माझा गाईड आणि गुरु झाला होता. व्हिएटनाम वॉरवरुन परत आल्यावर त्याने युनिव्हर्सिटीत ॲडमिशन घेतली. तेथेच डिपार्टमेंट सेक्रेटरीची, मॅरियमची ओळख झाली. तिचा नुकताच डिव्होर्स झाला होता. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. आणि लॅरी तिच्याबरोबर राहायला लागला. तिला स्टेडी जॉब होता. आणि राहायला घर होते. त्यामुळे लॅरीची सगळीच सोय झाली होती.

नोकरी मिळाल्यावर लॅरी आणि मी सनीसाइडला आलो. ती तिकडे सिॲटलला दोनशे मैलांवर.

एकदा संध्याकाळी मेक्सिकन रेस्टॉरंटमधे जेवण संपवून आम्ही मार्गारीटा पीत बसलो होतो. ऑक्टोबर महिना असल्याने अंधार लवकर व्हायला लागला होता. दिवसा नाहीतरी रात्री चांगलीच थंडी पडायला लागली होती. लॅरी जरा गप्पगप्पच होता.

"You are awfully quiet today" मी विचारले.

"Have a problem, Sanj" तो म्हणाला.

"Problem?"

"मॅरियम इकडे मुव्ह व्हायचे म्हणते."

"मग?"

"मी तिच्याबरोबर तीनचार वर्षे राहिलोय. तिला लग्न करायचय. इतके दिवस मी तिला थोपवून धरले होते. आधी माझे कॉलेज चालू होते म्हणून. नंतर नोकरी नव्हती म्हणून. आता मला नोकरीपण मिळाली आहे. फार मागे लागली आहे."

"तुला तर ती आवडते. मग काय हरकत आहे?" मी विचारले.

"हो. पण लग्न म्हणजे मोठी स्टेप आहे"

"मग घे की" मी मुद्दाम म्हणालो.

"You don't understand, Sanj" लॅरी म्हणाला.

I did understand. कारण माझीही त्याच्यासारखीच अवस्था व्हायला लागली होती. सुगंधाचे पुन्हा पत्र आले होते.

तिला प्रत्येक पत्रात मी आठवण करून दिली होती की "मला परत यायला अवकाश आहे. सारखा तुझाच विचार करतो. पण मास्टर्स झाल्याशिवाय परत कसा येऊ? आणि तुझ्या वडिलांचे काय?"

"मी त्यांचे मन वळवीन." ती लिहायची. "नाहीतर तसच लग्न करायला मी तयार आहे. अजून मी अज्ञान आहे. पण सहा महिन्यात अठरा वर्षाची झाल्यावर ते काही करू शकणार नाहीत"

मला भीति वाटत होती की तिच्या मैत्रिणीच्या थ्रू चाललेल्या आमच्या पत्रापत्रीचा कुणाला पत्ता लागला तर बातमी गावभर झाली असती. आणि करडे-पाटलांनी सुगंधाच्या लग्नाचा घाट घातला असता.

जरा थांब, सबुरीने घे असे सांगायची सोय नव्हती. तिने पुण्याहून मी निघायच्या वेळीच मला सांगितले होते "तुझ्याशिवाय मी जगू शकणार नाही".

जिवाचे काही बरेवाईट केले तर? पुन्हा इंडियात परत जाता आले नसते.

लॅरीच्या मदतीने मी पहिली कार घेतली. आता फक्त ड्रायव्हिंग लायसेंस मिळाले की मी इंडिपेंडेंट झालो. लगेच मी माझ्या कारचा पोलरॉइड इन्स्टंट फोटो घेऊन सुगंधाला पाठवला आणि लिहिले "ही माझी इथली सू. तुझ्यासारखी. लाडकी."

पुढच्या वीकएंडला माझी आणि मॅरियमची भेट झाली. उंच. ब्लॉन्ड. जरा ओल्ड साइडला. बोलकी. लॅरी, आलिया भोगासी असावे सादर झाला असावा. कारण त्याच दिवशी संध्याकाळी आम्ही जेवायला गेलो होतो तेव्हा "आम्ही लग्न करणार आहोत" ती म्हणाली. "You have to come".

"Congratulations" मी म्हणालो. "कधी? धिस समर? जुलै ऑगस्ट? तयारीला भरपूर वेळ मिळेल"

"तयारी? दोन आठवड्यात लग्न करणार आहोत." लॅरी म्हणाला.

"Civil marriage. कोर्टात जाऊन." माझ्या प्रश्नार्थक चेहरा बघून मॅरियमने सांगितले.

"सिव्हिल मॅरेज? Isn't that an oxymoron?" मी म्हणालो. दोघे हसले.

"पुढच्या शुक्रवारी संध्याकाळी. याकिमा कोर्टहाऊसमधे अपॉईंटमेंट घेतली आहे." लॅरी म्हणाला.

मॅरियम सिॲटलला परत गेली आणि लॅरीची सुटका झाली. दोन आठवड्यापुरती.

लॅरीच्या लग्नाची बातमी कामावर कळताच कुणीतरी बॅचलर पार्टीची आयडिया काढली. शुक्रवारी दोन कार घेऊन आम्ही सातआठ जण याकीमाला गेलो. ड्रिंक्स आणि जेवणानंतर कुणीतरी "डेजा व्हू" त जायची आयडिया काढली.

"डेजा व्हू?" मी विचारले.

"You will find out" आमचा फॅक्टरी मॅनेजर म्हणाला. "This is a part of your introduction to America, Sanj. Bet they don't have this in India"

कार पार्क करून बाहेर पडल्यावर डेजा व्हू काय आहे ते मला कळले. लाइटसची रोषणाई केलेल्या बिल्डिंगवर मोठमोठ्या पाट्या होत्या. टॉपलेस डान्सर्सच्या. अमेरिकेत हा प्रकार असतो हे मला माहीत होते. पण अजून गेलो नव्हतो.

कव्हर चार्जचे पैसे भरून आम्ही आत गेलो. बरोबरच्या मंडळीपैकी काही नेहेमीची गिर्हाइके असावीत. तिथला मॅनेजर आणि मुली हसून वेल्ह करत होत्या. तीन चार टेबलं घेऊन आम्ही स्टेजपाशी बसलो. नेहेमीच्या लोकांनी स्टेज भोवती असलेल्या खुर्च्या पकडल्या. मी उगीचच इकडेतिकडे बघत ओळखीचे कोणी नाही ना याची खात्री करत होतो. जरूर नव्हती तशी. कारण आख्या अमेरिकेत मला ओळखणारे कुणीच नव्हते.

लाऊड म्युझिक चालू होते. दोन मुली स्टेजवर डान्स् करत होत्या. इतर ट्रे वर ड्रिंक्स घेऊन सर्व्ह करत होत्या.

स्टेजवर ब्राइट लाइटस् आणि स्टेनलेस स्टीलचे, पॉलिश केलेले पोलस्. डान्स् करणाऱ्या मुली बिकीनी नाहीतर लान्जरे घातलेल्या. भरपूर मेकअप. दोन दोनच्या ग्रुपने दोन दोन डान्स् करत होत्या. एक विथ. एक विदाउट. टक लाऊन बघायला लाज वाटत होती. एक गोष्ट नोटिस केली ती ही की सर्व जणी एकदम फिट. रोज दोन तीन तास डान्स् केल्यावर दुसऱ्या काही एक्झरसाइजची गरजच नसावी. दिसायला सगळ्याच सुंदर. With ever ready smile. ड्रिंक्स अँड टिप्सवर भरपूर पैसे खर्च झाल्यावर सगळे उठलो.

आपापल्या कारमधून पस्तीस मैलाची ट्रीप करून रात्रीच्या अंधारात परतलो. डुलकया घेता घेता विचार येत होता की सुगंधाला काय वाटेल? खाडकन जाग आली. मला सगळे आयुष्यच सुगंधाला काय वाटेल म्हणत काढावे लागणार होते की काय?

अपार्टमेंटवर गेल्यावर सुगंधाचे पत्र दिसले. घरचे मुलं बघायचे म्हणतात. त्यांना आपल्या पत्रांचे अजून माहीत नाही. त्यांना वाटते की मी तुम्हाला विसरले. मी अजून सज्ञान झाले नाही. नाहीतर मी एकटी सरळ  निघून तुमच्याकडे आले असते.

सहा महिन्यात तिचा अठरावा वाढदिवस होता. तिची पळून जायची तयारी असेल असे मला वाटले नव्हते. तिची समजूत कशी काढावी हे मला समजत नव्हते.

आणि गेल्या पत्रापासून तिने मला "अहो" म्हणायला सुरुवात केली होती. आमचे अजून लग्न झाले नव्हते. आणि झाले असते तरी असा नाटकीपणा मला नको होता. त्यांच्या घरात तशी पद्धत असावी. कारण तिची आई तिच्या वडिलांना "साहेब" म्हणताना मी ऐकले होते.

त्यातच एका मित्राने पुण्याच्या पेपरची कात्रणं पाठवून बॉम्बशेल टाकले होते. त्यात करडे-पाटलांच्या राजकारणावर, त्यांच्या बिझनेसेस् वर, संस्थेच्या नावचे पैसे खिशात घातल्याबद्दल, आणि शिवाजीमहाराजांचे नाव घेत थापा मारण्याचे नवे रेकॉर्ड सेट केल्याचे मोठे आर्टिकल होते.

The guy was a jerk. But he was a crook too. How could he have not one but two pretty daughters?

लॅरी चक्रव्युहात अडकला होता. पण मला माझ्या समोर असलेला चक्रव्यूहाचे काय? सुगंधा was a hot property. But with a lot of baggage now.

**कोर्टात** चारची अपॉइंटमेंट होती. लॅरीने गाडी पार्क केली तेव्हा चारला दहा पंधरा मिनिटे कमी होती.

मॅरियम पर्स घेऊन तयार होईतो लॅरी कोर्टहाऊसच्या दारातून आत गेला होता. आत गेल्यावर कोर्ट नंबर ४ शोधायला आणखी पाच मिनिटे लागली. चारचा मुहूर्त टळून चालला होता. दोन तीन हॉलवेज पार केल्यावर ४ नंबरचा दरवाजा सापडला. पण दरवाजा बंद होता. आत अंधार होता.

तेवढयात जज् स्मिथ एका स्टाइलिश स्कर्ट आणि ब्लेझर घातलेल्या मुलीबरोबर येताना दिसले.

“Sorry folks. Running a little late today” म्हणत शेकहँड करून एकमेकांची ओळख करून घेतली. तोपर्यंत त्या मुलीने कोर्ट नंबर ४ चे दार उघडून लाइटस् ऑन केले.

जज् स्मिथ त्यांच्या केबिनमधे गेले व त्यांचा काळा गाऊन घालून आले व पायऱ्या चढून त्यांच्या खुर्चीवर जाऊन बसले. ती मुलगी कोण हा विचार माझ्या डोक्यात चालला होता. त्याचे उत्तर लगेच मिळाले. ती  जवळच्या टेबलापाशी असलेल्या खुर्चीवर जाऊन बसली. ब्रीफकेस उघडून तिने दोन तीन फाइल फोल्डर्स काढले. “this is Georgina. Senior Court Clerk” जज् स्मिथ म्हणाले “she will help us get going”

जॉर्जिनाने उठून फायली जजसाहेबांच्या पुढे ठेवल्या. त्यांनी त्यातले पेपर चाळून बघितले आणि म्हणाले “looks like somebody is going to tie the knot today”. आम्ही सगळे तोंडदेखले हसलो.

जॉर्जिनाने मॅरेज पर्मिट, आमच्या सगळ्यांचे आय. डी. चेक केले. आणि मानेनेच सगळे पेपरवर्क ठीक असल्याचे सांगितले.

“विटनेस कोण आहेत.” स्मिथसाहेबांनी विचारले. मी हात वर केला. “आणखी एक? दोन विटनेस हवे”

लॅरीने आणि मॅरियमने एकमेकाकडे बघितले. स्मिथसाहेबांना हे नवीन नसावे. “No worries.” ते म्हणाले आणि जॉर्जिनाला विचारले “Can you find out if Anne is available?

जॉर्जिना उठून बाहेर गेली. पाच मिनिटांनी परत आली तेव्हा बरोबर मघाशी आम्हाला दिसलेली जॅनिटर होती.

“Here is Anne. She will be our second witness today” स्मिथसाहेब हसत म्हणाले. ॲनही हसली.

वाटले, जॅनिटरच्या साक्षीने लग्न?

आम्ही सगळे उभे राहिलो. लॅरी आणि मॅरियम. लॅरीच्या शेजारी ॲन.  या बाजूला मॅरियमशेजारी मी. स्मिथसाहेब त्यांच्या प्लॅटफॉर्मवरून खाली आले व आमच्यासमोर उभे राहिले. आम्हाला हात वर करून खरे बोलणार अशी शपथ दिली. लॅरी आणि मॅरियमला विचारून त्यांच्या पहिल्या  लग्नाचे डिव्होर्स् फायनल झाले असल्याची खात्री करून घेतली.

हातातले पेपर वाचत लॅरी आणि मॅरियमचे “by the authority bestowed upon me by the State of Washington” सांगून लॅरी आणि मॅरियमचे लग्न लागल्याचे डिक्लेअर केले. आम्ही सगळ्यांनी सह्या केल्या.

स्मिथ साहेबांनी हात पुढे करून शेकहँड केला.

“Congratulations” ते लॅरीला म्हणाले “you may kiss the bride”. लॅरीने मॅरियमचे चुंबन घेतल्यासारखे केले. नंतर ॲनचेही घेतले. आणि मॅरियमने माझे. माझा गोरामोरा झालेला चेहरा बघून हसत जरा जास्तच वेळ घेतले. माझे ओठ ओले होई पर्यंत.

आता काय प्रोग्राम आहे असे स्मिथ साहेबांनी विचारल्यावर, लॅरीने रेस्टॉरंटमधे डिनर करून सनीसाईडला परत जाणार असे सांगितले.

“There is a nice steakhouse on the fourth avenue, You will like that” ते म्हणाले. माझ्याकडे बघत हसत “no steak for you, you can only have a biscuit there” असे म्हणत मी इंडियन असल्याची ओळख दिली. आमच्या मागून हायहील्सचा आवाज आला. जॉर्जिना तिच्या कारकडे गेली. जाता जाता तिने हसत आम्हाला हात केला.

“She likes you Sanj” लॅरी आम्ही माझ्या कारमधे बसल्यावर म्हणाला. लॅरी ड्राइव्ह करत होता. मॅरियम त्याच्या शेजारी बसली होती. आणि मी मागच्या सीट वर.

“Too bad. She doesn’t know Sanj is taken. Su is waiting for him”

तोच तर प्रॉब्लेम होता.

जज् साहेबांनी रिकमेंड केलेले स्टेकहाऊस सापडायला फारसा वेळ लागला नाही. शुक्रवार संध्याकाळ असल्याने गर्दी बरीच होती. पार्किंग लॉट भरला होता. रेस्टॉरंट बरेच मोठे होते. लागूनच बार होता. तोच जास्त भरला होता. मोस्टली फार्म वर्कर्स. बरेचसे मेक्सिकन. दोन तीन टीव्ही दिसत होते. एकावर स्पॅनिश चॅनल लागला होता.

आमचे रिझर्वेशन नव्हते. पण होस्टेसने पाच मिनिटात बार पासून लांब कोपऱ्यात एक टेबल दिले

लॅरीने शांपेन मागवली. आणि नंतर वाइन. मेनू जरावेळ चाळून बघितल्यावर त्या दोघांनी स्टेक आणि मी पॅस्टा ऑर्डर केला. फ्रेश बेक्ड ब्रेड वर बटर लाऊन तिघेही वाइन पीत बसलो. थोडा वेळ गप्पच होतो. तेवढ्यात वेट्रेस आमच्या प्लेटस् घेऊन आली.

“Here is your pasta” माझी प्लेट माझ्यासमोर ठेवत वेट्रेस म्हणाली. त्या दोघांना त्यांच्या स्टेक्स् दिल्या.

“Enjoy” जाता जाता ती आम्हाला म्हणाली.

“सॉन्ज, आता तुझी पाळी” मॅरियमने बोलायला सुरुवात केली.

“त्याच्या मागे नको लागू आता. तुझे लग्न झाले ना?’ लॅरीने मी उत्तर द्यायच्या आधीच सुरुवात केली.

“माझे झाले ना म्हणजे? आपले झाले. मी काही तुला फोर्स नाही केले.” मॅरियम लॅरीला म्हणाली.

त्यांचे लक्षण मला काही चांगले दिसत नव्हते. लग्नाला अजून दोन तास सुद्धा झाले नव्हते. पण त्यांची खडाजंगी सुरू झाली होती. गेले काही दिवस मी बघत होतो. काही ना काही कारणामुळे कुरबुर सुरू व्हायची. कधी तो ड्रायव्हिंग फास्ट करतो म्हणून, त्याचे वजन वाढत चालले म्हणून, सारखा शिट, शिट म्हणतो म्हणून, ती सिगरेट ओढते, नवीन कार घे म्हणते म्हणून.

मॅरियमने सिगरेट शोधायला सुरुवात केली.

“You promised to quit smoking” लॅरीने आवाज वाढवला.

“And you promised to stop getting sloshed and blow money.” मॅरियमने आठवण करून दिली. “How much did you spend on topless dancers? You are not a young sailor anymore.”

“I am getting out of here” लॅरी उठत म्हणाला आणि स्टेकहाऊसच्या बाहेर गेला.

“Sorry Sanj. I can’t stand him sometimes” मॅरियम म्हणाली.

कारची किल्ली माझ्याजवळ होती. पण लॅरी परत येईपर्यंत आम्हाला तेथे थांबणे भाग होते.

लॅरी कुठे गडप झाला होता ते कळेना. रेस्ट रूम मधे एवढा वेळ लागला नसता.

“Looks like you are going to take me home tonight, Sanj” मॅरियम म्हणाली.

“मी कसा काय नेणार? मला अजून ड्रायव्हिंग लायसेंस नाही मिळाले” तिला आठवण करून देत मी विषय बदलला.

“माझ्याजवळ आहे की” मॅरियम

मी तिला सिगरेट ऑफर केली.

मॅरियमने वाइनचा रिकामा ग्लास हाताने वर उचलला आणि वेटरला आणखी एक राऊंड आणायची खूण केली. मी दिलेली सिगरेट ओठात धरली. पण लगेच पेटवली नाही. मी खिशात लायटर शोधायला लागलो. ती टक लाऊन माझ्याकडे बघत होती. डोळ्यांत खट्याळ हसू दिसत होते. तिच्या ओठांचा ओला स्पर्श मला अजून आठवत होता.

कोपऱ्यात मोठ्या टीव्ही मॉनिटरवर MTV टॉप हिट्सची व्हिडिओ चालू होती. रेस्टॉरंटच्या स्पीकरवर गाणे ऐकू येत होते.

“Third rate romance,

Low rent rendezvous”